**Date: May 15, 2021**

To,
The Listing Department
**National Stock Exchange of India Limited,**
Exchange Plaza, C-1, Block G,
Bandra Kurla Complex
Bandra (E), Mumbai – 400051

**Symbol:** BSE **ISIN:** INE118H01025

**Ref: Regulation 47(1)(b) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations")**

**Subject: Intimation on publication of financial results in the newspapers**

Dear Madam/Sirs,

With reference to the above captioned subject, please find enclosed newspaper publication in following mentioned newspapers on Saturday, May 15, 2021 : Financial Express (English) and Navshakti (Marathi), containing Audited Financial Results (Consolidated & Standalone) for the quarter and year ended March 31, 2021, as approved by the Board of Directors at their meeting held on Thursday, May 13, 2021.

The same will also be available on the website of the Company: www.bseindia.com

This is for your information and record please.

Thanking you,
Yours faithfully,
**For BSE Limited**

**Sd/-**
**Prajakta Powle**
**Company Secretary and Compliance Officer**

**Encl: a/a**

## स्टडी ग्रुपचा जॉब रेडी प्रोग्राम


**मुंबई** – परदेशात शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळण्याकरिता आघाडीची जागतिक आंतरराष्ट्रीय शिक्षण प्रदाता स्टडी ग्रुपने महत्त्वाकांक्षी जॉब रेडी प्रोग्राम लाँच केला आहे. याद्वारे अर्जदारांना त्यांच्या युके पार्टनर विद्यापीठांमध्ये शिकत असताना त्यांची कौशल्ये आणि नोकरीच्या क्षमता सिद्ध करता येतील. जे विद्यार्थी युके इंटरनॅशनल स्टडी सेंटर किंवा इंटरनॅशनल कॉलेजमध्ये जागा निश्चित करुन त्यांच्यासाठी या सेवेचे मूल्य प्रदान केले जाणार आहे अशी माहिती स्टडी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक जेम्स पिटमॅन यांनी दिली.

## वाढदिवस


माधुरी दिक्षीत
अभिनेत्री


राहुल धुत
उद्योगपती


एकनाथ डवले
आयएएस


राम पोथीनी
अभिनेता

दिलीप भोळे – माजी आमदार
प्राची देवस्थळी – लेखिका
तुषार टेकावडे – सामाजिक कार्यकर्ता
राजेश रोकडे – पत्रकार

**Happy Birthday with 'नवशक्ति'**

**आपल्या प्रियजनांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी navshakti.news@gmail.com या मेलवर अथवा ७२७६८०७४३४ या व्हॉट्सअॅप नंबरवर वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर माहिती युनिकोडमध्ये फोटोसह पाठवा.**

## राशिभविष्य

**मेष** – आज आपल्यामध्ये वेगळाच उत्साह असेल. महत्त्वाची कामे हातावेगळी करण्यास सहाय्य मिळणार आहे. नातेवाईक, शेजारी व्यक्तींचे सहकार्य मिळणार आहे. त्यांच्याशी संबंध चांगले निर्माण होणार आहेत.

**वृषभ** – घरातील कुटुंबातील वातावरण चांगले राहील. घरामध्ये सर्वांशी सुसंवाद साधाल. घरातील ज्येष्ठांची मदत मिळेल. घरातील आनंदासाठी खर्च वाढणार आहे. कुटुंबातील व्यक्तींच्या समाधानात आनंद मिळणार आहे.

**मिथुन** – आपण स्वभाव गोड बोलणारे आहात. आपल्या बोलण्यात कुशलता नेहमीच असते. हजरजबाबीपणा असतो. आजच्या दिवसात आपल्या या व्यक्तिमत्त्वाचा फायदा होणार आहे. महत्त्वाची कामे गोड बोलून करून घ्या.

**कर्क** – आजचा दिवस कंटाळवाणा वाटेल. वास्तविक पाहता नको त्या गोष्टींचा जास्त विचार केल्यामुळे मनावर ताण येण्याची शक्यता वाटते. महत्त्वाचे निर्णय टाळलेलेच बरे. आर्थिक प्रश्न अजिबात सोडवू नका जास्त खर्च होईल.

**सिंह** – महत्वाच्या कामांमध्ये समस्या निर्माण झाल्या तरी तुम्ही आत्मविश्वासपूर्वक त्या सोडवण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी तुम्हाला सहयोगी सहाय्य करतील त्यातून लाभ प्राप्त होणार आहेत. आर्थिक नियोजन चांगले ठेवा. मनोरंजनासाठी वेळ घालवाल.

**कन्या** – आज आपणास भरपूर काम असणार आहे. रिकामा वेळ मिळणार नाही. काम खूप असल्याने कामाचे नियोजन करा, महत्त्वाच्या कामांना प्राधान्य द्या. अडचणींवर कुशलतेने मात कराल. समाधानकारक दिवस असेल.

**तुळ** – मोठ्या आणि प्रतिष्ठित व्यक्तींशी गाठीभेटी होतील. योग्य व्यक्तींशी संवाद साधून स्वतःच्या कामात प्रगती कराल. त्यामुळे मोठी कामे मिळू शकतात. आर्थिक फायदा होईल. सामाजिक प्रतिष्ठा मिळू शकते.

**वृश्चिक** – मानसिक स्वास्थ्य कमी लाभेल. कामाची गती धीमी राहील. मनाला आनंद देणाऱ्या गोष्टी करा. नको त्या गोष्टीत लक्ष घालू नका.

**धनु** – महत्वाची कामे होतील. केलेल्या कामाचे श्रेय मिळेल. पत्नीचा सल्ला मोलाचा ठरणार आहे. आर्थिक व्यवहार व्यवस्थित करा. व्यवसायामध्ये वेगळेच लाभ होण्याची शक्यता आहे. कामानिमित्त छोटा प्रवास होऊ शकतो.

**मकर** – नोकरीमध्ये आज जास्तच धावपळ करावी लागणार आहे तब्येतीकडे मात्र लक्ष असू द्या. त्याप्रमाणेच काम करा. स्पर्धेमध्ये भाग घेतल्यास आपणास विजय मिळणार आहे. नोकरीमध्ये सहकार्य कमी मिळणार आहे.

**कुंभ** – आपणास व्यापार उद्योगामध्ये नवीन संधी मिळेल. संधीचा फायदा करून घ्या. आपले स्वकर्तुत्व दाखवण्यासाठी तुम्ही प्रयत्न. त्यात यश निश्चित मिळणार आहे. कामासाठी प्रवास होऊ शकतो.

**मीन** – आपणास आज मनस्वास्थ्य लाभणार आहे. कामाव्यतिरिक्त भरपूर वेळ रिकामा असण्याची शक्यता आहे. रिकामा वेळ योग्य कामासाठी वापरा. घरातील महत्त्वाच्या कामांना प्राधान्य द्या.

## पंचांग

आज मिती वैशाख शु त्रितीया शके १९४३ त्रितीया ०७.४९ पर्यंत चंद्र नक्षत्र मृगशीर्ष ०८.३८ पर्यंत ,योग धृती २६.२७ मिनिटापर्यंत, चंद्र रास मिथुन ,भारतीय सौर २५ वैशाख शके १९४३म्हणजेच, शनिवार दिनांक १५ मे २०२१.मुंबईचा सूर्योदय ०६.०४ मुंबईचा चंद्रास्त ०७|०५ मुंबईचा चंद्रोदय ०८.३१ मुंबईचा चंद्रास्त १०.१५ रात्री .राहू काळ ०९.१९ ते १०|५७यम गंड काळ ०२.१२ ते ३.५० गुलिक ०६.०४ ते ०७.४१विनायक चतुर्थी, अगस्ती श्रलोप.

## दिनविशेष

**१७१८ :** जगातल्या पहिल्या मशीन गन बंदूकेचे पेटंट जेम्स पक्कल यांनी घेतले.
**१७३० :** रॉबर्ट वॉल्पोल युनायटेड किंग्डमचे पहिले पंतप्रधान झाले.
**१८११ :** पॅराग्वेला स्पेनकडून स्वातंत्र्य मिळाले.
**१८३६ :** सूर्यग्रहणातील खग्रास स्थितीपुर्वी दिसणाऱ्या बेलीज बीड्सचे शास्त्रज्ञ फ्रॅन्सिस बेली यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले.
**१९२८ :** मिकी माऊस कार्टून प्लेन क्रेजी या शोमधून पहिल्यांदा प्रसारित केले गेले.
**१९३५ :** मॉस्को शहरात भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
**१९४० :** दुसरे महायुद्ध – हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.


## शब्दवेध (४८०९)



*आडवे शब्द:- १) संसद, ४) आचरण, ७) फासळी, ९) मजबूत; १०)नजीक, ११) सूत्रधार, १३) आरोप, १४) गढूळ, १६) औषधोपचार, १८) सरहद्द, १९) पक्ष; कड, २०) मालदार, २३) षोडश- वर्षा, २७) अविलंब, २८) जिना, २९) रोगमुक्त;चांगला, ३०) हडळ.*

*उभे श ब्द : – २) शक्तिमान, ३) बोजा, ४) वयाने मोठा, ५) अभिनेता, ६) सघंटितपणा, ८) अव्यव- स्थित, १०) मेघ; अविलंब, १२) मिळवता, १३) सकंट- काळ; आपत्काल, १५) कट्टर; कठोर, १७) बहिष्कृत, २१) लहान (वयाने), २२) मग्न; तल्लीन, २४) रक्त, २५) रामाचा जनक, २६) आसक्त.*

**या कोड्याचे (क्र.४८०९) उत्तर**



# 'तौक्ते' चक्रीवादळाचा धोका

## जम्बो कोविड सेंटर परिसरातील धोकादायक झाडांची छाटणी

**प्रतिनिधी/मुंबई**

'तौक्ते' चक्रिवादळाचा धोक लक्षात घेऊन मुंबई महापालिकेच्या उद्यान विभागाद्वारे कोविड बाधित रुग्णांसाठी उभारण्यात आलेल्या जम्बो कोविड सेंटर परिसरालगत असणाऱ्या धोकादायक वृक्षांची छाटणीस सुरवात केली आहे.

भायखळा व मुलुंड परिसरातील रिचर्डसन अॅण्ड क्रुडास, एन. एस. सी. आय. डोम, एम. एम. आर. डी. ए., बीकेसी जम्बो, नेस्को जम्बो कोविड सेंटर, दहिसर जकात नाका, कांदरपाडा, शीव, मालाड, कांजुरमार्ग इत्यादी ठिकाणी असणाऱ्या जम्बो कोविड केंद्रांलगतच्या ३८४ झाडांची छाटणी करण्यात आली आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इतर ठिकाणी असणाऱ्या धोकादायक झाडांची छाटणीही करण्यात येत आहे. वेगाने वारे वाहिल्यास त्यादरम्यान झाडे किंवा फांद्या पडण्याची शक्यता असते, ही बाब लक्षात घेऊन आवश्यक ते मनुष्यबळ साधनसामुग्रीसह व वाहनांसह उपलब्ध करुन घेण्यात आले आहे.

**रुग्णालयांनी दक्षता घ्यावी!**

'तोक्ते' चक्रीवादळाचा धोका लक्षात घेता मुंबई महापालिका सज्ज झाली असून वीज प्रवाह खंडित होण्याची शक्यता आहे. आवश्यक ती इंधन उपलब्धता देखील करवून घ्यावी, जेणेकरुन रुग्णांना देण्यात येणा-या सोयी सुविधांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, अशाही सूचना देण्यात येत आहेत.

**पूर बचाव पथके तैनात!**

वेगाने वारे वाहण्याची शक्यता व पर्जन्यवृष्टीची संभाव्यता लक्षात घेऊन महानगरपालिका क्षेत्रातील ६ चौपाट्यांवर पूर बचाव पथके तैनात करण्याचे निर्देश मुंबई अग्निशमन दलास देण्यात आले आहेत. तसेच या सर्व ठिकाणी मुंबई पो-लीसांच्या मोबाईल व्हॅन्स कार्यतत्पर ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व चौपाट्यांवर नागरिकांना जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

# एम. डी. शाह महिला कॉलेजचा 'मिशन होप' उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी**

मालाड येथील जनसेवा समिती संचालित श्री. एम. डी. शाह महिला महाविद्यालय आणि श्रीमती टी. एस. बाफना कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने 'मिशन होप' प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.कोरोनामुळे समाजात निर्माण झालेले भीतीचे वातावरण आणि त्याबद्दलचे गैरसमज दूर करून जनजागृती निर्माण करणे, समाजात आशावाद निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश असून मान्यवर डॉक्टर, मानसोपचार तज्ज्ञ, महानगरपालिका अधिकारी, स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी विद्यार्थिनी आणि पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

व्याख्याते आणि विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद साधणे. कोव्हिड हेल्पलाईन, विनामूल्य योग वर्ग, गरजू विद्यार्थिनींना आर्थिक सहाय्य असे प्रकल्पाचे स्वरूप आहे. सामाजिक बांधिलकीच्या या भावनेतून प्राचार्या डॉ. दीपा शर्मा यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. मोहनभाई पटेल यांच्या हस्ते शनिवार १५ मे रोजी सायंकाळी ४.०० वाजता होणार आहे. स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रंजन मणियार यावेळी विद्यार्थिनींशी संवाद साधतील.

# मराठा आरक्षणाचा तिढा वाढणार?



**प्रासंगिक**



**अरविंद भानुशाली**

मराठा आरक्षणाचा चेंडू राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा आधार घेऊन केंद्र सरकारवर भिरकावला आहे. परंतु, देशातील अन्य राज्यातील आरक्षणाचे प्रश्न संपले नसल्यामुळे हा तिढा कायमच राहणार आहे. २०१५ मध्ये गुजरातमध्ये पाटीदार समाजाने आरक्षणासाठी आंदोलन केले. ते मराठा आंदोलनापेक्षा तीव्र होते. त्या आंदोलनातूनच हार्दीक पटेल हे युवा नेतृत्व पुढे आले. २०१४ मध्ये राजस्थान हरीयाणामध्ये जाट समाजाने आरक्षणासाठी आंदोलन केले होते. त्यावेळी झालेल्या गोळीबारात शेकडो जाट मारले गेले. जाट काय किंवा पाटीदार काय या दोन्ही समाजाचे आरक्षण अजुनही केंद्राकडे प्रलंबित आहे. महाराष्ट्रात मराठा समाजाआधी धनगर समाजाने आरक्षणाची मागणी करत आंदोलन केले होते. तो ही प्रश्न तसाच आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाबाबत केंद्र एकाकी भूमिका घेईल असे वाटत नाही.

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा काल किंवा आजचा नसून २००४ पासूनचा आहे. २०१४ ते २०१९ मध्ये फडणवीस सरकारचे राज्य होते. त्यावेळी खऱ्या अर्थाने या आंदोलनाला जोर चढला. लाखोंचे मूक मोर्चे निघाले. नंतर आंदोलनातील अदृष्य राजकारण्यांचे हात पुढे आले. त्यावेळचे विरोधक आणि आत्ताचे सत्ताधारी आंदोलनात उतरले होते. पण, त्यांनाही हा प्रश्न सोडवता न आल्याने आता केंद्राकडे बोट दाखविले जात आहे. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाचा प्रश्न होता तेव्हा केंद्र आपली भूमिका मांडत नाही अशी हाळी देऊन आजची सत्ताधारी मंडळी मोदींच्या नावाने खडे फोडीत होती. त्यानंतर न्यायालयात केंद्राने आपली भूमिका स्पष्टपणे मांडली. त्यावर ५० टक्क्याच्या पुढे आरक्षण देता येत नाही असा निकाल देऊन उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय फेटाळून लावला. म्हणून आता सत्ताधारी व विरोधकांमध्ये जुंपली आहे.

मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंसह महाविकास आघाडीच्या सरकारमधील प्रतिनिधींनी राज्यपालांची भेट घेतली. त्यांना निवेदन दिले. राज्यपालांकडे शिष्टमंडळ नेण्याचा कदाचित फार्स असावा. आता मुख्यमंत्री उध्दव ठाकरे या प्रश्नावर पंतप्रधान व राष्ट्रपतींना भेटणार आहेत असे सांगण्यात येत आहे. १९९२ - ९३ च्या दंगलीवेळी विरोधकांनी काहूर माजवून शिवसेना प्रमुखांना लक्ष केले होते. त्यानंतर १९९५ मध्ये राज्यात सेना-भाजप युती सरकार आले आणि दंगली बंद झाल्या. तेव्हा विरोधक म्हणत, दंगली घडवणारे सत्तेत आल्यामुळे आता दंगली कशा होतील? त्याचा प्रत्यय आज 'मराठा' आंदोलनाच्या निमित्ताने पुन्हा येत आहे. फडणवीसांच्या कारकिर्दीविरोधात लाखो मराठ्यांचे मोर्चे निघाले. मात्र, आरक्षण रद्द करण्याच्या निर्णय येताच हे मोर्चे थांबले. कारण, मराठा मोर्च्यांना रसद पुरविणारे राष्ट्रवादी- काँग्रेसचे नेते आता सत्तेत आहेत.

२०१६ च्या गुजरातमधील निवडणुकांमध्ये भाजपचा पराभव होण्यासाठी काँग्रेसने हार्दीक पटेल यांच्या मदतीने आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करुन तीव्र आंदोलन केले. त्या निवडणुकीत त्याचा थोडा फार फटका भाजपाला बसला. पण, सरकार भाजपचेच आले. त्यानंतर, पाटीदार समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न न्यायालयात जाऊन प्रलंबीत राहिला. हार्दिक पटेल काँग्रेसवासी होऊन भाजपाविरोधी नेतृत्व करताहेत. पाटीदार समाजाचे आरक्षण मात्र बारगळले. राजस्थान, हरियाणात जाट समाजाची तीच अवस्था. हा समाज कर्मठ, त्यांनीही प्रचंड मोर्चे काढले. दिड ते दोन वर्षे वातावरण तापले होते. काही ठिकाणी गोळीबार झाला, निरपराध माणसे मृत्यूमुखीही पडली. तो प्रश्नही न्यायालयात गेला आणि प्रलंबित राहिला.

महाराष्ट्रात त्यामानाने ओबीसीला १९ टक्के तर धनगर व भटक्या जमातीला पाच टक्के आरक्षण मिळाले आहे. पण, धनगर समाजाला एनटीऐवजी एसटीमध्ये (आदिवासी जमातीत) आरक्षण हवे आहे. ते देण्यास आदिवासी समाजाचा विरोध आहे. मुस्लिमांनाही ५ टक्के आरक्षण हवे आहे. घटनेच्यादृष्टीने धार्मिक आरक्षण देता येत नाही. तरीही महाविकास आघाडीतील नेते मुस्लिम आरक्षणावर ठाम आहेत. महाविकास आघाडीत असल्यामुळे शिवसेनेला समर्थन द्यावे लागेल. मराठा आरक्षणाबाबत उच्च न्यायालयात स्थगिती उठवून आरक्षण देण्यास मान्यता देण्यात आली. त्यावेळी शिवसेना भाजपची सत्ता होती. मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन मसुद्याला पाठिंबा दिला. शिवसेनेच्या मंत्र्यांची सूचना मान्य करून प्रस्ताव तयार केला होता, असे असतानाही मुख्यमंत्री उध्दव ठाकरे मागील सरकारवर आरोप कसे करतात? हा प्रश्न आहे.

मराठा समाजातील मोठे नेते मराठा आरक्षणाबाबत उत्साही नव्हते. याचे मुख्य कारण म्हणजे मराठा समाजातील धनाढ्य गटाला अन्य कार्यकर्ते मोठे होणे आवडत नव्हते. राज्यात कोरोनाचा हाहाःकार सुरू असतानाच 'मराठा' आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे पुन्हा ऐरणीवर आला. लस, रेमेडीसीवीर, ऑक्सिजन यावरून सुरु असणाऱ्या आरोप-प्रत्यारोपांमध्ये आता मराठा आरक्षणाची भर पडली आहे. उच्च न्यायालयात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षण कायम ठेवले. तर, मुख्यमंत्री उध्दव ठाकरे म्हणतात, आरक्षणाच्या प्रश्नात उच्च न्यायालयात त्रुटी ठेवल्याने सर्वोच्च न्यायालयात हरलो. मराठा आरक्षणाचा प्रश्न २००४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सुरू झाला. त्याला १७ वर्षे झाली. या सतरा वर्षांचा इतिहास पाहिल्यास ५ वर्षे भाजपची सत्ता सोडल्यास १२ वर्ष आघाडीचीच सत्ता होती. मराठा आरक्षणाची पहिली ठिणगी स्व.विलासराव देशमुख यांच्या काळात पडली. त्यानंतर, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री झाले. निवडणुकीच्या तोंडावर पृथ्वीराज चव्हाणांनी मराठा आरक्षण जाहीर केले. ते उच्च न्यायालयात टिकले नाही. आरक्षण देताना निकष काय? मागास आयोगाचा रिपोर्ट आहे का? असे अनेक प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित करत हे आरक्षणच रद्द केले. पुढे २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले. मराठा आंदोलकांचे लाखोंचे मोर्चे निघाले. पुन्हा सत्ताबदल झाला. मग आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर हा 'सकल मराठा' कुठे थांबला?

तामिळनाडुने बहुउद्देशीय बाब म्हणून ६० टक्के आरक्षण मिळवले. तो धागा पकडून १०२ कलमाचा आधार घेऊन युती सरकारने उच्च न्यायालयात आरक्षण मिळवले. पण, सर्वोच्च न्यायालयात ही लढाई लढताना ढिलाई होती. सुनावणी दरम्यान राज्य सरकारचे वकीलच न्यायालयात हजर नव्हते. त्यानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या स्थगितीविरोधात याचिका दाखल करत सर्वोच्च न्यायालयाच्या फुल बेंचपुढे हा खटला चालवावा अशी मागणी केली. पण, त्या फुल बेंचनेही मराठा आरक्षण रद्द ठरविले. त्या निकालपत्रात केंद्र सरकार ५० टक्केच्यावर आरक्षण देण्याचा कायदा करू शकते असे सुतोवाच केले आहे. परंतु, केंद्र सरकारने तसा निर्णय घेतला तर पुन्हा पाटीदार व जाट समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न निर्माण होणार आहे.

मध्यंतरी 'मराठा' समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण देण्याची चर्चा सुरु होताच ओबीसी संघटनांचे मोर्चे सुरू झाले. मराठा आरक्षणावरच्या मुद्द्यावरुन राज्यपालांना आघाडी सरकारचे जे शिष्टमंडळ भेटले त्यात ओबीसी नेते मंत्री छगन भुजबळ नव्हते. महाविकास आघाडीचे सर्वेसर्वा शरद पवार हे ही चूप आहेत. राज्यात मराठा समाजाचे आंदोलन सुरु असताना शिवसेनेच्या मुखखपत्र सामनातून आंदोलनविरोधात विडंबनात्मक व्यंगचित्र आले होते. त्यावरून मराठा समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. आता केंद्राकडे जाताना राज्य सरकारने राज्याचे नविन मागास आयुक्तालय स्थापन केले पाहिजे. त्यात काही विशेष दुरूस्त्या करुन तो अहवाल केंद्रीय मागास विभाग आयुक्तालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. केंद्रीय मागासवर्गीय आयोग व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची सांगड घालून यावर निर्णय करता येऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के कायम ठेवली असल्यामुळे केंद्राला पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शन घ्यावे लागेल. पण, यामधून मार्ग काढताना अन्य घटकांचाही केंद्राला विचार करावा लागणार आहे. त्यामुळे यातून केंद्र सरकार कोणता मध्यम मार्ग काढणार की जाट, पाटीदार समाजाप्रमाणेच मराठा आरक्षणाचेही घोंगडे भिजत ठेवणार हा प्रश्न आहे.

# ऑक्सिजन उत्पादनात पुढाकार घ्या- मुख्यमंत्री

**विशेष प्रतिनिधी/मुंबई**

राज्याला ऑक्सिजन उत्पादनात स्वयंपूर्ण बनविण्यासाठी मिशन ऑक्सिजनची अंमलबजावणी करीत असून साखर उद्योगाने ऑक्सिजन निर्मितीच्या क्षेत्रात पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी केले.

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्यातील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केले. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, साखर कारखान्यातील ईथेनॉल प्रकल्पात काही फेरबदल करुन विकसित करण्यात आलेला हा प्रकल्प कोरोनाविरुद्धच्या लढ्यात अतिशय महत्वाचा आहे. यापासून इतर उद्योग आणि सहकारी साखर कारखान्यांनी प्रेरणा घ्यावी असे सांगितले.

कोरोनाविरुद्धचा पहिला लढा आपण जिंकला आहे. पहिल्या लाटेत आपण मोठ्या प्रमाणावर टेस्टींग लॅब उभारल्या. कोविड केअर सेंटर उभारले, बेडची क्षमता वाढवली. पण, दुसऱ्या लाटेचे आव्हान मोठे असून राज्याच्या विविध भागातून येणारे अहवाल पाहिले असता आता या लाटेवरही आपण मात करू शकू असा विश्वास आहे. पण त्यासाठी आपण ऑक्सिजन निर्मितीमध्ये स्वावलंबी व्हायला हवे. महानगरपालिकांप्रमाणे सहकार क्षेत्रानेही ऑक्सिजन निर्मितीत पुढाकार घ्यावा असेही ते म्हणाले.

# २१ ते २३ मे दरम्यान 'फेसबुक लाईव्ह' द्वारे वसंत व्याख्यानमालेचे आयोजन

**प्रतिनिधी/मुंबई**

बोरीवली पूर्व येथे गेल्या ३८ वर्षापासून ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य हे वसंत व्याख्यानमालेचे आयोजन करत आहेत. गत वर्षी कोरोनामुळे व्याख्यानमालेच्या कार्यकर्त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरीत 'फेसबुक लाईव्ह'द्वारे वसंत व्याख्यानमाला सुरु ठेवली होती. सुमारे अठरा ते वीस हजार रसिक श्रोत्यांपर्यंत ही व्याख्यानमाला पोहोचली.

गेल्या वर्षी मिळालेला प्रतिसाद पाहता यावर्षीही फेसबुक लाईव्हद्वारे वसंत व्याख्यानमाला आयोजित केली आहे. २१ मे २०२१ रोजी सायंकाळी ७.३० वाजता अतुलशास्त्री भगरे गुरुजी हे 'मानवी जीवनातील पाच विशेष योग' या विषयावरील व्याख्यानाने व्याख्यानमालेचा शुभारंभ करतील. २२ मे २०२१ रोजी ज्येष्ठ नेत्रशल्य चिकित्सक पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने हे 'कोरोनाशी लढाई आपण जिंकणारच' या विषयावर दुसरे पुष्प गुंफतील तर 'माझा चरित्रात्मक लेखन प्रवास' या विषयावर ज्येष्ठ सुसंवादिनी मंगलताई खाडिलकर प्रेक्षकांशी संवाद साधून वसंत व्याख्यानमालेचा समारोप करतील.

http://www.facebook.com//vasantvyakhyanmalajaimaharashtranagarBorivli103993061323124/?ti=as या लिंक वर प्रेक्षकांना वसंत व्याख्यानमालेचा लाभ घेता येणार आहे. कोरोना काळात शासकीय नियमांचे काटेकोर पालन करावे, मास्कचा वापर आवर्जून करावा. सामाजिक अंतर राखावे आणि वारंवार हात स्वच्छ धुवावेत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


EXPERIENCE THE NEW

**BSE Limited**

CIN: L67120MH2005PLC155188
(Formerly known as Bombay Stock Exchange Limited)
Registered office: Floor 25, P J Towers, Dalal Street, Mumbai 400001
Extract of Standalone and Consolidated Financial Results for the quarter and year ended March 31, 2021

₹ in Lakh

| S. No. | Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended March 31, 2021 Audited | Year ended March 31, 2021 Audited | Quarter ended March 31, 2020 Audited | Quarter ended March 31, 2021 Audited | Year ended March 31, 2021 Audited | Quarter ended March 31, 2020 Audited |
| | **Continuing Operation** | | | | | | |
| 1 | Total Income | 14,188 | 56,505 | 13,051 | 17,001 | 65,465 | 15,579 |
| 2 | Net Profit for the quarter / year (before Tax, Exceptional and/or Extraordinary items and share of net profits of investments accounted for using equity method) | 3,085 | 13,052 | 48 | 3,701 | 12,395 | -34 |
| 3 | Net Profit for the quarter / year before Tax (after Exceptional and/or Extraordinary items and share of net profits of investments accounted for using equity method) | 3,085 | 11,599 | 48 | 4,826 | 15,257 | 627 |
| 4 | Net Profit for the quarter / year after tax (after Exceptional and/or Extraordinary items and share of net profits of investments accounted for using equity method) | 1,495 | 9,726 | 159 | 3,175 | 14,170 | -191 |
| | **Discontinued Operation** | | | | | | |
| 5 | Profit from discontinued operation | - | - | - | - | - | - |
| 6 | Net Profit from total operation for the quarter / year after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 1,495 | 9,726 | 159 | 3,175 | 14,170 | -191 |
| | (a) Attributable to the shareholders of the Company | 1,495 | 9,726 | 159 | 3,257 | 14,490 | -131 |
| | (b) Attributable to the non controlling interest | - | - | - | -82 | -320 | -60 |
| 7 | Total Comprehensive Income for the quarter / year [Comprising Profit for the quarter / year (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 1,549 | 10,003 | 182 | 3,342 | 14,147 | 592 |
| | (a) Attributable to the shareholders of the Company | 1,549 | 10,003 | 182 | 3,414 | 14,497 | 581 |
| | (b) Attributable to the non controlling interest | - | - | - | -72 | -350 | 11 |
| 8 | Equity Share Capital (Face value of ₹ 2 each) | 900 | 900 | 900 | 900 | 900 | 900 |
| 9 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | - | 217,817 | - | - | 248,342 | - |
| 10 | Earnings Per Equity Share (Face value of ₹ 2/- each) (not annualized) (in ₹) | | | | | | |
| | **Continuing Operations** | | | | | | |
| | (a) Before Exceptional Items | | | | | | |
| | - Basic : | 3.26 | 23.30 | 0.35 | 6.93 | 33.00 | -0.42 |
| | - Diluted : | 3.26 | 23.30 | 0.35 | 6.93 | 33.00 | -0.42 |
| | (b) After Exceptional Items | | | | | | |
| | - Basic : | 3.26 | 21.23 | 0.35 | 6.93 | 30.94 | -0.42 |
| | - Diluted : | 3.26 | 21.23 | 0.35 | 6.93 | 30.94 | -0.42 |
| | **Total Operations** | | | | | | |
| | (c) After Exceptional Items | | | | | | |
| | - Basic : | 3.26 | 21.23 | 0.35 | 6.93 | 30.94 | -0.42 |
| | - Diluted : | 3.26 | 21.23 | 0.35 | 6.93 | 30.94 | -0.42 |

Note:
1. The above is an extract of the detailed format of financial results for the quarter and year ended on March 31, 2021. The full format of financial results for the quarter and year ended on March 31, 2021 are available on the Company's website at www.bseindia.com and at the website www.nseindia.com of National Stock Exchange of India Limited.
2. 'The Board of Directors of the Company at its meeting held on May 13, 2021 have recommended a payment of dividend of ₹ 21/- per equity share of ₹ 2/- each. The proposal is subject to the approval of shareholders at the ensuing Annual General Meeting.

For and on behalf of Board of Directors of
BSE LIMITED
sd/-
Ashishkumar Chauhan
Managing Director & CEO

Place :- Mumbai
Date : May 13, 2021


epaper.freepressjournal.in